नियमित दिवाणी दावा क्र. १३९/२०२१
अकबरखान –वि–प्रिती

## अर्ज नि.क्र. ६७ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अनुसार दाखल करुन प्रतिदाव्यात सुचविलेली दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे.

०२. प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ वादी ) यांनी त्यांचे लेखी म्हणणे देवून अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शविला आहे.

०३. उभयपक्षांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. खालील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमीमांसेसह देत आहे.

| अ.क्र. | मुद्दा | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१ | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होय |
| ०२ | कोणता आदेश | अर्ज मंजूर करण्यात आला |

## कारणमीमांसा

**मुद्दा क्र.१ व २ करिताः**

०४. प्रतिदाव्यातील वादीचे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, तात्पुरता मनाई आदेश पारित होण्यापूर्वी पर्यंत वाद मिळकतीवर प्रतिदाव्यातील वादींचा ताबा होता. परंतू, तात्पुरता मनाई आदेश पारित झाल्यानंतर त्या आधारे प्रतिदाव्यातील प्रतिवादी (मुळ वादी) यांनी वाद मिळकतीवर ताबा केला आहे. सदरची वस्तुस्थिती प्रतिदाव्यात नमुद करणे तसेच त्या अनुषंगाने विनंती परिच्छेद १३–अ मध्ये देखील दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

०५. प्रस्तुत संचिकेचे अवलोकन केले असता दावा दिनांक २४.०७.२०१५ रोजी प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी वाद मिळकती संदर्भात केलेला खरेदीचा व्यवहार रद्द होवून निरंतर मनाई आदेश मिळण्याकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नि.क्र. ३५ अनुसार त्यांचा प्रतिदावा मुळ वादी विरुध्द दाखल केला आहे. मुळ वादी यांनी दाखल केलेला तात्पुरता मनाई आदेश मिळण्याचा अर्ज मंजूर झालेला आहे. पुढे न्यायालयाचे असेही निदर्शनास येते की, प्रस्तुत अर्जात नमूद घटना अर्ज नि.क्र.०५ वरील आदेश पारित झाल्यानंतर घडलेली आहे. अशा परिस्थिती मध्ये वर नमूद घटनेचा उल्लेख प्रतिदाव्यात असणे आवश्यक आहे. प्रस्तुत अर्जात सुचविलेल्या दुरुस्ती मुळे प्रतिदाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. सबब, वरील सर्व कारणांचा विचार करता प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादींच्या मागणीनुसार मंजूर होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज नि.क्र.६७ मंजूर करण्यात आला.

०२. प्रस्तुत अर्जात सुचवलेली दुरुस्ती प्रति दाव्यातील वादींनी त्यांच्या वादपत्रात आजपासून १४ दिवसांच्या आत करुन घ्यावी आणि तसी दुरुस्ती प्रत सादर करावी.

Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2024.07.23 11:46:20 +0530

(अ.अ.शेख)

दिनांकः२२.०७.२०२४

दिवाणी न्यायाधीश व स्तर

मेहकर

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II ) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 22.07.2024
Date of Uploading : 23.07.2024